# मदत

रात्र झाली तसा पावसाचा जोर अधिकच वाढत गेला. नद्यांचं पाणी भराभर वाढू लागलं. पंचगंगेला पूर आला, वारणा दुथडी भरुन वाहू लागली आणि वेदगंगेचं पाणी पात्र सोडून बाहेर पडलं! तहसील कचेरीत सगळयाची धावपळ उडाली. कलेक्टर कचेरीत रात्रपाळीला नेमलेला कारकून रात्रभर खणखणणाऱ्या फोनवरुन माहिती घेत होता आणि महत्वाची माहीती असेल तर मध्येच कलेक्टरांना घरी निरोप देत होता.

कलेक्टर नुकतेच कोल्हापूरला बदलून आले होते. कलेक्टर पदावर त्यांची ही पहिलीच नेमणूक! जळगावच्या जिल्हा परिषदेत, चांगले काम केल्यामुळे, शासनाने कोल्हापूरला जिल्हाधिकारी म्हणून त्यांना नेमले. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास अधिकच वाढला होता.

पहाटे, कलेक्टर स्वतः कचेरीत आले, तेव्हा, रात्रपाळीचा कारकुन टेबलावर डोकं टेकवून, गाढ झोपला होता. रात्रभर अनेकवेळा, फोनमुळे झोपमोड झाल्यानं त्याचा चेहरा सुस्तावला होता. टेबलावरती महत्वाची कागदपत्रं त्यांनी पाहीली. त्यानंतर, आपल्या लाकडी नक्षीदार खुर्चीवर, मागं मान टाकन, डोळे मिटून शांतपणे ते बराच वेळ पडून राहीले. बराच वेळानं, शिपायाने वायरलेस संदेश टेबलावर ठेवला. तेव्हा, आवाजाने ते जागे झाले. पूर अधिकच वाढत चालल्याचा तो संदेश त्यांनी वाचला, आणि लगोलग तहसिलदारांना फोन करुन, वस्तुस्थितीची थेट माहीती घेतली आणि सूचना दिल्या.

सतत तिन दिवस प्रचंड पाऊस कोसळत राहीला. अनेक गावांमध्ये पाणी शिरलं. घरांची पडझड झाली, आणि, कित्येक जनावरं वाहून गेली. शेतीची अतोनात हानी झाली होती. हळूहळू गावागावची माहीती येऊ लागली आणि मदत देण्यासाठी आमदारांचे कलेक्टरांना फोनही!

मंत्रालयातून आपद्ग्रस्तांना मदत देण्याचा निर्णय झाला. आणि प्रशासन कामाला लागलं. बाधीत लोकांना तातडीनं मदत देण्याचे कलेक्टरांनी आदेश दिले, आणि, ते स्वतः गावांची पाहणी करुन लोकांना दिलासा देण्यासाठी बाहेर पडले.

कलेक्टरांची कार दुपारी खानापूर गावांत शिरली. मोठी माणसं लगबगीनं त्याबाजूला धावली. गावातली लहान पोरं गाडीमागं पळू लागली. पाटील, सरपंच, तलाठी यांची धांदल उडाली. शाळेजवळ थोडावेळ कार थांबली तेव्हा गांवचे पूढारी - बाबासाहेब पूढं झाले, आणि हातानेच त्यांनी पडलेल्या घरांची दिशा दाखविली.

मग गाडी हळूहळू त्या दिशेनं गेली त्यापाठोपाठ बाबासाहेब, पाटील, सरपंच आणि इतर माणसं घाईघाईने चालू लागली.

साहेब गाडीतून उतरताच बाबाहेबांनी थेट कोल्हापूरी पध्दतीने, वाकून नमस्कार केला. त्याबरोबर तलाठी, सरपंच, पाटील पुढं झाले आणि त्यांनीही अदबीने नमस्कार केला. माणसांनी सभोवती गर्दी केली. नुकसानीबाबत साहेबांनी प्राथमिक माहीती घेतली. पडझड झालेल्या घरांची यादी त्यांनी तलाठयाकडून घेतली आणि घरांची पाहणी करायला सुरुवात केली. घराच्या पडलेल्या भागापर्यंत जाऊन पाहणी करायची आणि घरातल्या कर्त्या माणसांची विचारपूस करायची, असा हा कार्यक्रम होत राहीला. एक घरं पाहून कलेक्टर परत रस्त्यावर येईपर्यंत, लोक आपलच घर पहावं म्हणून "इकडे इकडे" असं हातवारे करीत ओरडत. काहींनी तर बाबासाहेबांचा हात ओढून " आमचंच घर दाखवा की", अशी सुचना केली. आणि गोंधळात अधिकच भर पडत गेली. हळूहळू गर्दी वाढू लागली. पडलेल्या घरांसाठी, प्रत्येकाला किती मदत मिळणार? याची लोकांच्यात चर्चा सुरु झाली.

चावडीच्या पूढं वळणावर, म्हातारी जनाबाई काठी हातात घेऊन भिंतीला टेकून उभी होती. म्हणूनच आजूबाजूच्या बायकांकडे हातवारे करुन ओरडून सांगत होती, "मेलं,  माझं गरीबाचे घर पडलयं पर ते बघाया हिकडं का येइनात?"

पडलेली सर्व घरं यादीप्रमाणे संपवत कलेक्टर घाईघाईनं चावडीकडं निघाले, तशी जनाबाईनं उचल खाल्ली. भिंतीला मागं जोर देत लगबगीनं काठी टेकवीत ती पूढं सरसावली, आणि मोठयानं ओरडून सांगू लागली, "आम्हा गरीबाचं घर पडून किती लुकसानी झाली, पण कोण लक्ष देया कां? उगी मोठयांची घर बगायची?" त्यावर दहा-पाच जणांनी म्हातारीला गप्प बसविण्याचा प्रयत्न केला. सरपंच गर्दीतच खेकसले, "म्हातारे गप की! का कालवा करतीस?"

चलाख कलेक्टरांचं लक्ष म्हातारीकडं वळले. त्याबरोबर बाकीचे लोक बाजूला सरले. मामलेदार, तलाठी, गांवचे पूढारी साहेबांच्या मागं मागं गेले. कलेक्टरांनी अगदी आदबीनं जनाबाईला विचारलं, "आजी काय म्हणणं आहे आपलं?" "माझं बी घर पडलया, परं तलाठी पंचनामा करीत न्हाय. मला मदत का म्हून देण्याची न्हाय?"

त्याबरोबर कलेक्टरांचा पारा चढू लागला. तलाठयाला जवळ बोलावून त्यांनी खडसावून विचारले "या बाईच्या घराचा का पंचनामा केला नाही?"

"साहेब, तिचे कायबी नुकसान झालेलं नाही," सरपंचांनी मध्येच खुलासा केला. त्याकडे दुर्लक्ष करुन कलेक्टरांनी तलाठयाकडं पाहीलं. त्यावर घाबरलेल्या स्वरात तो म्हणला, "साहेब पावसानं तिच्या घराचं खरंच काही नुकसान झालेलं नाही. मी,

पाटील, सरपंच बघून आलोय" त्याबरोबर रागाने लाल झालेले कलेक्टर म्हातारीला म्हणाले, "चल, तुझं घरं दाखव बघू".

म्हातारी पूढं झाली, कलेक्टर आणि बाकी सर्व लोक चालत तिच्या घरापर्यंत आले. बाहेरुन घरं चांगलं दिसत होतं. आतल्या खोलीत घेऊन जात म्हातारी साहेबांना म्हणाली, "साहेब, हे बघा! समदं धान्य भिजून गेलया! रातीचं झोपाया जागा राहीली न्हाय! सगळं ओलंचिंब झालय, आम्ही गरीबानं काय करावं आन् कस जगावं?"

"हे बघा साहेब," म्हणून तिनं चूलीच्या वरच्या कोपऱ्यात छपराच्या खाली पडलेली भिंत दाखवली. संपूर्ण भिंत पावसानं ओली झाली होती. भिंतीचा, वरचा अंदाजे एक फूटभर रुंदीचा कोपरा पडला होता. कलेक्टरांनी ते पाहीलं आणि, "आजी, काही काळजी करुन नका, तूम्हाला मदत मिळेल," असा दिलासा दिला, तेव्हा म्हातारी सुखावली.

बाहेर येतांना मामलेदारांना त्यांनी तलाठयावर ताबडतोब कारवाई करण्यास सुनावलं. "तुमचं लक्ष नाही, तुमचे लोक बरोबर काम करीत नाहीत!" असं सुनावीत कलेक्टर रागारागाने कारमध्ये बसले. सुसाट वेगात त्यांनी कार कोल्हापूरकडं निघून गेली.

रात्री अनेक गावे फिरुन, कलेक्टर बंगल्यावर पोहोचले, तेव्हा रात्रीचे साडेनऊ वाजले होते. त्यांची आई, ते येण्याचीच वाट पाहत होती. "दमला असशील नाही आज? फार नुकसान झाले कारे पावसानं?" आईनेच जेवतांना विषय काढला.

"नुकसान फार झालयं, आई. हजारो घरं पडलीत, शेकडो जनावरं वाहून गेलीत. शेतीचं पण बरच नुकसान झालयं" अस म्हणत त्यांनी दिवसभर घडलेला वृत्तांत सांगितला. आईला आपल्या मुलाचा अभिमान वाटला. खानापूरच्या म्हातारीची गोष्ट ऐकून तर आईला रडू कोसळलं. "असं उपयोगी पडावं लोकांच्या, मोठयांचे आशीर्वाद घेशील तर, कल्याण होईल बघ! असं ती म्हणाली. "अगं! खालचे लोक काहीच पहातं नाहीत. मी गेलो नसतो ना आज, तर त्या गरीब म्हातारीला मदत मिळू शकली नसती." अशी बराच वेळ दोघांची चर्चा झाली. आपल्या हातून एखादं चांगले काम झालं की किती बरं वाटतं! तसं त्यांना वाटलं. चांगल्या कामाचा त्यांना गर्व वाटत राहीला अन् त्या विचारातच त्यांना केव्हातरी गाढ झोप लागली !

इकडं, जना म्हातारी खुशीत होती. जरा लवकरचं तिनं काटयाकुटया गोळा केल्या आणि चुलीला जाळ लावला. तव्यावर एक भाकरी टाकून आणि निखाऱ्यावर दुसरी भाकरी हातानी उभी धरीत ती आपल्या नातवाला म्हणाली, "आनंदा, जगात वागायचं म्हंजी हुषार व्हायाचं, बाबा! आरं, काठीनं ढकलून ढकलून भिंतीचा कोपरा पाडला तवा कुठं पंचनामा होण्याजोगं भगदाड पडलं! आजुन माझा हात दुखतोय!

आता आपल्याला तिन हजार रुपये मदत मिळणार! जगच आसं हाय बाबा. असं वागाया शिक तवा तू मोठा होशील!" तिचा नातू आनंदा म्हातारीकडं कौतूकानं पाहू लागला. चूलीच्या जाळाच्या प्रकाशात तांबडया झालेल्या तिच्या चेहऱ्यावर एक वेगळं तेज दिसत होतं. तिच्या डोळयात चमक होती. आणि त्यात आनंदाबद्दल उद्याची आशा भरलेली होती !